महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
कल्पतरु पॉइंट, २, ३ आणि ४ था मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव सर्कलजवळ, शीव (पू), मुंबई - ४०० ०२२
Kalpataru Point, 2nd, 3rd and 4th floor, Opp. Movie Max Cinema, Near Sion Circle, Sion (E), Mumbai – 400 022
दूरध्वनी/ Tel: 022-67808888/67808831
संकेतस्थळ / Website: www.mpcb.gov.in
ई- मेल/ Email- eb@mpcb.gov.in

जा.क्र. मप्रनि/आस्था/

दिनांक :

# जाहिरात

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये कामकाजाकरिता "तांत्रिक सहायक" हे पद राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ अथवा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ अथवा शासकीय/निमशासकीय सेवेतील गट-ब मधील वेतनस्तर एस-१४ किंवा अधिक या वेतनश्रेणीत वेतन घेतलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून करार पध्दतीने भरण्यासाठी पात्र उमदेवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदांचा तपशील, पदसंख्या सदर पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, आवश्यक अनुभव व कंत्राटी पदाचे मानधन इत्यादी बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | पद | शैक्षणिक पात्रता | अनुभव | कमाल वयोमर्यादा | प्रस्तावित जागा | प्रस्तावित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तांत्रिक सहायक | Degree in Engineering<br>or<br>Post Graduate degree in Environment Science<br>or<br>Higher Qualification | राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ अथवा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ अथवा शासन सेवेतील तांत्रिक व पर्यावरण विषयक कामकाजाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा. प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये अनुभव असल्यास प्राधान्य. | ६५ वर्ष | ३२ | सा.प्र.वि. शासन निर्णय दिनांक ०६ जून २०२५ |

**अटी व शर्ती :**

१. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा नागरीक असावा.
२. संगणक हाताळणी व इंटरनेटचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील.
३. उच्चतम वयोमर्यादा दिनांक ०१/०५/२०२६ रोजीची ग्राहय धरण्यात येईल.
४. जाहिरातीतील पद मंडळातील नियमित पद नसून सदर पद निव्वळ कंत्राटी स्वरुपाचे आहे. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.
५. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी सदर पदाकरिता विहित नमून्यात अर्ज सादर करावा.
६. सदर नियुक्ती १२ महिन्यांकरिता राहील. त्यानंतर उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे आवश्यकतेनुसार पुनर्नियुक्ती/मुदतवाढ देण्यात येईल.

**उमेदवारांकरिता सर्वसाधारण सूचना:**

१. सदर पदासाठी अर्जाचा नमूना www.mpcb.gov.in/recruitment या लिंकवरुन Download करुन सदर अर्जामध्ये छायाचित्रासहीत परिपूर्ण अर्ज recruitment@mpcb.gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावेत.
२. अर्जावर पदाचे नाव ठळकपणे नमूद केलेले असावे.
३. अर्जासोबत उमेदवाराने आपला ई-मेल आयडी नमूद करणे अनिवार्य आहे व इतर संपूर्ण माहिती,(शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे/प्रमाणपत्रे, अनुभव इ.) जोडावी.
४. अर्जासोबत मूळ कागदपत्रे जोडू नयेत फक्त स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडण्यात याव्यात.
५. वरील पध्दतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी ३०/०४/२०२६ ते ११/०५/२०२६ असा आहे.
६. मुलाखतीद्वारे निवड करण्यात येऊन, पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी दिनांक व वेळ स्वतंत्रपणे फक्त ई-मेल द्वारे दिनांक १५/०५/२०२६ पर्यत कळविण्यात येईल.
७. या संदर्भातील शासनाकडून वेळोवेळी निर्गमित झालेले/होणारे शासन निर्णय, सूचना, नियम व कायदे इ. लागू राहतील.
८. नेमणूक महाराष्ट्रात कुठेही करण्यात येईल, परंतु सोयीनुसार नेमणूकीचा प्रयत्न करण्यात येईल.
९. म. प्र. नि. मंडळाचे सर्व निर्देश लागू राहतील.
१०. भरती करावयाच्या पदसंख्येत वाढ किंवा घट करण्याचे अधिकार मंडळाच्या सक्षम प्राधिकारी यांना राहतील.

**सदस्य सचिव**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**